Students' Bulletin, University of Pune

# Chetana
# चेतना



Editor in Chief : Dr. Arun Adsool
Actg. Vice Chancellor

Publisher : Dr. Manik Jadhav,
Registrar

Editor : Dr. Sambhaji Pathare,
Director, Board of Students Welfare


Issue 5 : 2 January 2010 :
Diamond Jubilee Year

## Inside

Page No.

3 Past Events
3 Current Affairs
5 University Campus
6 Co-Curricular
7 Extra-Curricular
9 Announcements & Highlights
10 College Activities
12 Visitors











## विद्यार्थी कल्याण मंडळाच्या विविध योजना

- विद्यार्थी सुरक्षा विमा योजना
- आपत्कालीन साहाय्य योजना
- विद्यार्थिनी व्यक्तिमत्त्व विकास योजना
- डॉ. पी. सी. अलेक्झांडर वक्तृत्व स्पर्धा
- अभिरूप न्यायालय स्पर्धा
- समर्थ भारत अभियान
- प्लेसमेंट सेंटर
- महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा
- एन. सी. सी. छात्रांचा सत्कार समारंभ
- शैक्षणिक उपक्रम, कार्यशाळा, चर्चासत्र, उजळणी वर्ग
- 'कमवा व शिका' शैक्षणिक हमी योजना
- विशेष मार्गदर्शन योजना
- निर्भय कन्या अभियान
- युवक महोत्सव
- आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षण
- विद्यार्थी वार्ता प्रकाशन
- विद्यापीठ प्रतिनिधी शिबिर
- विद्यापीठ प्रतिनिधी निवडणूक व विद्यार्थी परिषद
- साहस शिबिरे
- पदव्युत्तर जिमखाना



## संपादकीय

पुणे विद्यापीठाचा आज १०३वा पदवीप्रदान समारंभ, याप्रसंगी 'चेतना' या विद्यार्थी वार्तांच्या पाचव्या अंकाचे प्रकाशन भुवनेश्वर येथील सेंट्रल युनिव्हर्सिटी ऑफ ओरिसाच्या कुलगुरु प्रा. (डॉ.) सुरभी बॅनर्जी यांच्या शुभहस्ते व पुणे विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु (डॉ.) अरूण अडसूळ यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होत आहे. अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी त्यांच्यातील उपजत कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी विद्यार्थी कल्याण मंडळ सातत्याने प्रयत्नशिल आहे.

या शैक्षणिक वर्षातील 'अश्वमेध' क्रीडा स्पर्धातील सर्वसाधारण विजेतेपद, 'इंद्रधनुष्य' युवक महोत्सवातून मिळविलेला हीज हायनेस जगद्गुरू चंद्रशेखरेंद्र सरस्वती फाईन आर्टस् फिरता चषक, अखिल भारतीय विश्वविद्यालय संघाद्वारे आयोजित पश्चिम विभागीय युवक महोत्सवातून मिळविलेली सहा महत्वपूर्ण पारितोषिके, राज्यस्तरिय कौटिल्य चषक, विनायकराव पाटील स्मृती राज्यस्तरिय वादविवाद स्पर्धेतील प्रथम क्रमांक, ल. मा. सुभेदार राज्यस्तरिय वक्तृत्व स्पर्धेतील प्रथम क्रमांक, समर्थ भारत अभियानाच्या माध्यमातून प्रकाशित झालेले 'दत्तक गावांच्या इतिहासाचे खंड', राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून राबविलेले समाजाभिमुख उपक्रम, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील संचलनासाठी निवड झालेले विद्यार्थी या विद्यापीठाच्या महत्वपूर्ण उपलब्धी होत. उमेश सिंग या विद्यापीठाच्या इंग्रजी विभागातील विद्यार्थ्याच्या कांदबरीची माननीय राष्ट्रपतींनी केलेली प्रशंसा व संगमनेर महाविद्यालयाच्या भक्ती डांगे हिने मिळविलेले डॉ. शंकर दयाळ शर्मा सुवर्णपदक या बाबी विद्यापीठास भूषणावह आहेत.

१०३ व्या पदवीप्रदान समारंभातून एकूण ६८ सुवर्णपदके गुणवंत विद्यार्थी विद्यार्थीनींना प्रदान करण्यात आली त्यापैकी ४२ सुवर्णपदके फक्त मुलींनीच मिळविली आहेत. ही बाब देखील वाखाणण्याजोगी व इतरांना प्रेरणा देणारी आहे. सर्व संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था व पदव्युत्तर विभागांतून उच्च शिक्षण संपादन करणाऱ्या आपणा सर्व विद्यार्थ्यांच्या या नेत्रदीपक यशामुळे पुणे विद्यापीठाच्या लौकिकात भर पडत आहे व याचा विद्यापीठालाही सार्थ अभिमान आहे. म्हणूनच 'चेतना'च्या माध्यमातून या सर्व आठवणी आपल्यापर्यंत पोहोचविण्याचा विद्यार्थी कल्याण मंडळ प्रयत्न करत असते. आपल्या संस्थेचा, महाविद्यालयाचा विविध उपक्रमांत असलेला सहभाग त्यात विद्यार्थ्यांनी मिळविलेले नैपुण्य याबाबतची माहिती 'चेतना'साठी अवश्य पाठवा. पुणे विद्यापीठाच्या हिरक महोत्सवानिमित्त १० फेब्रुवारी, २०१० रोजी 'चेतना' विशेषांक प्रकाशित करण्याचा विद्यार्थी कल्याण मंडळाचा मानस आहे. याकरिता महत्वपूर्ण ठळक घडामोडींची माहिती फोटोसह त्वरित पाठवावी.

'चेतना' अजूनही बाल्यावस्थेत आहे.. त्यामुळे सुधारणांना खूप वाव आहे, समितीने सुचविलेल्या सदरांखाली आम्ही माहिती देत आहोत. तथापि, अंकाविषयी काही बदल, सूचना, अथवा प्रतिक्रिया असल्यास जरूर कळवा, त्यांचा लाभ सर्वांनाच होईल.

या अंकाच्या निर्मितीसाठी ज्यांचे सहकार्य लाभले त्या सर्व विभागप्रमुख, प्राचार्य, प्राध्यापक, विद्यापीठातील अधिकारी, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी व विद्यार्थी कल्याण मंडळाचे सेवक यांना धन्यवाद दिलेच पाहिजेत. प्रा. गणेश राऊत यांचे 'चेतना' प्रकाशनाच्या सहकार्यातील सातत्य वाखाणण्याजोगे आहे. विद्यापीठाच्या हीरकमहोत्सवी वर्षानिमित्त सर्व वाचकांना शुभेच्छा !

**डॉ. संभाजी पठारे**
संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ




## अंत:प्रज्ञेची जाणीव आवश्यक

विद्यार्थी मित्रहो,

हे युग शिक्षणाचे आहे. सध्याचा कालखंड हा ज्ञानाचा आहे. 'Knowledge Era' असे या काळाचे वर्णन केले जाते. अशा परिस्थितीत 'ज्ञान' आणि 'शिक्षण' या मुलभूत संकल्पनांचा फार वेगळा विचार आपल्याला करावा लागणार आहे. 'शिक्षण' हे परिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानले जात असेल, तर प्रस्थापित शिक्षण व्यवस्थेला काही प्रश्न विचारावे लागणार आहेत. त्याकरिता सध्याच्या शिक्षण प्रणालीचा डोळसपणे अभ्यास करावा लागणार आहे.

पुणे विद्यापीठाचा 'हीरक महोत्सव' आणि महाराष्ट्र राज्याचा 'सुवर्ण महोत्सव' संपन्न होत असताना प्रचलित शैक्षणिक धोरणांबाबत वैचारिक मंथन अपरिहार्य आहे. जागतिकीकरणामुळे उच्च शिक्षणात आवश्यक असलेले बदल आपण प्राधान्याने स्विकारत आहोत. अभ्यासक्रम, अध्यापन, संशोधन व परीक्षा पध्दतीतही आवश्यक ते बदल करून कार्यक्षम नागरिक आपल्यातून घडावेत यासाठी पुणे विद्यापीठ सातत्याने प्रयत्नशिल आहे. शिक्षण प्रक्रियेत सामाजिक मुल्यांचा आणि नैतिक मुल्यांचा जाणिवपूर्वक समावेश करावा यासाठी विद्यापीठ आणि शैक्षणिक संस्था यांच्या जबाबदाऱ्या निश्चितच वाढल्या आहेत. केवळ ज्ञाननिर्मिती, ज्ञानसाठवण किंवा ज्ञानाचा उपयोग एवढयाच अपेक्षा शिक्षणव्यवस्थेकडून राहिल्या नसून ज्या संवेदनशिल सहजिवनाच्या संकल्पनेतून आपल्या संस्कृतीची स्थापना झाली त्या मूळ विचारालाच धक्का बसू नये याचेही भान ठेवण्याचा प्रयत्न विद्यापीठ करत आहे. शॉर्टकट, देखावा, फसवणूक आणि तत्सम बाबींना तिलांजली देण्याचा आपल्यापैकी प्रत्येकाने जाणिवपूर्वक प्रयत्न केलाच पाहिजे. मला वाटते हे आपणास सहज शक्य आहे. परंतू त्याकरिता प्रत्येकाने अंत:प्रज्ञेच्या प्रकाशात निर्णय घेण्यास सुरूवात करणे आवश्यक आहे. सामाजिक परिवर्तन घडवून आणायचे असेल तर या शिक्षण प्रक्रियेत आपल्यापैकी प्रत्येकाने अंत:प्रज्ञेची जाणिव ठेवणे आवश्यक आहे.

**डॉ. अरूण अडसूळ**
प्रभारी कुलगुरु



## चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय, शिरूर, आयोजित आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा :




पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ आणि चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय, यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठस्तरिय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळा राळेगणसिद्धी, ता. पारनेर, जि. अहमदनगर येथे दि. १ ते ८ डिसेंबर, २००९ या कालावधीत संपन्न झाली.

कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी मा. आलोक अवस्थी, कमांडट, एन.डी.आर.एफ., मा. कुलगुरू, डॉ. अरूण अडसूळ, डॉ. संभाजी पठारे, संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ, मा. चंद्रकांतजी बाफना, मा. सुकुमारजी बोरा, मा. प्राचार्य नंदकुमार निकम, मा. प्राचार्य टी. एन. कानवडे, मा. प्राचार्य नितीन घोरपडे, आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यशाळेचे उद्‌घाटन ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण मा. अण्णासाहेब हजारे यांच्या हस्ते करण्यात आले.

या दिवशी एन.डी.आर.एफ द्वारा आपत्ती व्यवस्थापनात वापरण्यात येणाऱ्या सर्व साधनांचे प्रदर्शन भरविण्यात आले. कार्यशाळेमध्ये मा. संजय त्यागी यांचे भारतातील आपत्ती व्यवस्थापन, एन.डी.आर.एफ. ची आपत्ती व्यवस्थापनातील भूमिका, कार्ये, आपत्तीचे स्वरूप व प्रकार, आगींचे प्रकार, रसायनामुळे होणाऱ्या आपत्ती आदी विषयांवर व्याख्याने झाली. तसेच इन्सपेक्टर पंकज मिश्रा यांचे मानवी शरीराचा अभ्यास, पेशंटची तपासणी प्रथमोपचाराची तंत्रे, जखमींवरील उपचारांच्या पद्धती, विषबाधा–प्रकार यांवर प्रात्यक्षिकांसह व्याख्याने झाली.

या कार्यशाळेत एकूण ९८ महाविद्यालयांतील ९२ विद्यार्थीनी व १४४ विद्यार्थी सहभागी झाले होते. समारोप प्रसंगी मा. डॉ. संभाजी पठारे, संजय त्यागी, प्राचार्य राऊत, प्राचार्य नंदकुमार निकम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही आपली मनोगते व्यक्त केली. समारोप प्रसंगाचे प्रास्ताविक प्रा. हरिदास जाधव यांनी केले.

कार्यशाळेच्या नियोजनात प्रा. हरिदास जाधव, प्रा. केशव गाडेकर, प्रा. सौ. रत्नप्रभा जाधव व प्रा. पद्माकर प्रभुणे यांचा महत्वपूर्ण सहभाग होता.

## बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव, जि. पुणे आयोजित विद्यापीठ विद्यार्थी प्रतिनिधी कार्यशाळा

'संधी ज्यांची त्यानेच खेचायची असते' असे प्रतिपादन पुणे विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू, मा. डॉ. अरूण अडसूळ यांनी केले. ते घोडेगाव येथील आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित, बी. डी. काळे महाविद्यालय व पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ यांचे संयुक्त विद्यमाने दिनांक २७ व २८ डिसेंबर, २००९ रोजी आयोजित केलेल्या विद्यापीठ विद्यार्थी प्रतिनिधींच्या कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. चंदूशेठ फेरवाणी हे होते. या कार्यशाळेसाठी पुणे, अहमदनगर व नाशिक या तीन जिल्ह्यामधील १७० महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थांमधील विद्यापीठ प्रतिनिधी उपस्थित होते. उद्‌घाटन समारंभाचे स्वागत व प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. इंद्रजीत जाधव यांनी तर सुत्रसंचालन डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर यांनी केले.

दुपारच्या सत्रात विद्यापीठातील विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या विभागात चालणाऱ्या कामकाजाविषयीची माहिती विद्यापीठ विद्यार्थी प्रतिनीधींना दिली. त्यानंतर विद्यापीठ प्रतिनिधींनी त्यांना येणाऱ्या अडचणींबाबत शंका विचारून त्यांचे निरसन अधिकाऱ्यांकडून करून घेतले. तसेच विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक, डॉ. संभाजी पठारे यांनी विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी कल्याण मंडळाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली.

सायंकाळी हास्यसम्राट प्रा. अजितकुमार कोष्टी, सांगली यांचा 'हसवणूक' हा बहारदार कार्यक्रम झाला.

दिनांक २८ रोजी सकाळी सर्व विद्यापीठ प्रतिनीधींनी भिमाशंकर दर्शन केले. त्यानंतर मा. वंदन राम नगरकर यांचे 'व्यक्तीमत्व विकास' या विषयावर चर्चात्मक व्याख्यान झाले.

कार्यक्रमाच्या समारोप समारंभासाठी पुणे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. माणिक जाधव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी मा. जयसिंगराव काळे होते.



# Current Affairs

## १०३ वा पदवीप्रदान समारंभ :

पुणे विद्यापीठाचा १०३ वा पदवीप्रदान समारंभ शनिवार, दिनांक ०२ जानेवारी, २०१० रोजी संपन्न झाला. यावेळी भुवनेश्वर (ओरिसा) येथील केंद्रीय विद्यापीठाच्या कुलगुरु प्रा. (डॉ.) सुरभी बॅनर्जी यांचे दीक्षान्त भाषण झाले. अध्यक्षस्थानी पुणे विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु डॉ. अरुण अडसूळ होते. विविध विद्याशाखांतील पदवी, पदव्युत्तर पदवी, एम. फिल, पी.एच.डी. व डिप्लोमा संपादन करणाऱ्या ५६,१६६ विद्यार्थ्यांनी पदवी प्राप्त करण्यासाठी विद्यापीठाकडे अर्ज सादर केले होते. त्यांना विद्यापीठाकडून पदवी प्रदान करण्यात आली. यापैकी ४१,४९४ विद्यार्थ्यांना पदवी, १३,०२१ विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवी, १११ विद्यार्थ्यांना एम. फील, १,२४१ विद्यार्थ्यांना डिप्लोमा तर २९९ विद्यार्थ्यांना पी.एच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे.

### विविध शाखांतर्गत सुवर्ण पदकांचे मानकरी :

| Sr. No. | Name of Gold Medals | Name of Candidate |
|---|---|---|
| 1. | " The President of India, Dr. Shankar Dayal Sharma Gold Medal " For Year 2009. | Smt. Dange Bhakti Ravindra |
| 1. FACULTY OF ARTS AND FINE ARTS | | |
| 1. | "The M. N. Advant Smruti Suvarna Padak" | Smt. More Kalyani Nathu |
| 2. | "The Late Balwant Sahadev Tidke Gold Medal " | |
| 3. | "The Late Pramila Dattatray Alegaonkar Suvarna Padak " | |
| 4. | " Shri Mahadeo Ramkrishna Alegaonkar Smruti Suvarna Padak " | Smt. Navaghane Snehal Prakash |
| 5. | " The Late Principal N.G.Alias Nanasaheb Suru Gold Medal " | |
| 6. | " The Shri B.J.Patel Diamond Jubilee Trust Gold Medal " | Shri. Rajopadhye Hemant Prakash |
| 7. | " The Alegaonkar Bandhu Smruti Suvarna Padak " | Smt. Maureemootoo Kama |
| 8. | "Late Vasant Sabnis Gold Medal" | Shri. Mandar Deshpande |
| 9. | "The Chancellor's Gold Medal" | Smt. Potnis Nupur Shrikant |
| 10. | "Dattatray Mahadev Alegaonkar Suvarna Padak " | Smt. Kate Vandana Tukaram |
| 11. | "Late Suryakant Chotu Gokhale Gold Medal" | Shri. Avinash Patil |
| 2. FACULTY OF MENTAL MORAL & SOCIAL SCIENCE | | |
| 1. | " The Sudhatai Dhavale Gold Medal " | Smt. Menon Ashwini Rajgopal |
| 2. | "Smt. Indirabai Kulkarni Suvarna Padak" | |
| 3. | " Shri Yashwantrao Chavan Smruti Suvarna Padak " | Shri Pawar Dnyaneshwar Balbhim |
| 4. | " Smt Nalini Thakar Suvarna Padak" | |
| 5. | "Late Smt. Vijaya Deshmukh Gold Medal" | Smt. Maharnor Sandhya Rangnath |
| 6. | "The Hari Malini Joshi Gold Medal" | Smt. Ghogare Supriya Haribhav |

| Sr. No. | Name of Gold Medals | Name of Candidate |
|---|---|---|
| **3. Faculty of Science** | | |
| 1. | "Padmashree Late N. S. Venkatesan Gold Medal" | |
| 2. | "Late Dr. T. S. Mahabale Gold Medal" | Smt. Autade Mrinali Madhav, |
| 3. | "Padmashree Shri Dr. S.B. Mujumdar Gold Medal" | Smt. Thakkar Jagruti Arvind |
| 4. | "Control Dynamics Company (Biotechnology) Gold Medal" | Smt. Shah Saloni J. |
| 5. | "Smt. Dr. Meera Suresh Kapale, M. Sc. Biochemistry Gold Medal" | Smt. Samudra Sukhada Prakash, |
| 6. | "कै. भाऊसाहेब थोते स्मृती सुवर्णपदक" | Smt. Subbarayan Nisha Krithivasan |
| 7. | "कै. भाऊसाहेब थोते स्मृती सुवर्णपदक" | Smt. Kunjithai Rukmini Ravindranath, |
| 8. | "Late Principal Ranglar Gopalkrishna Laxman Chandratraya Gold Medal" | Smt. Satpute Shital Dattatrya, |
| 9. | "Late Principal Ranglar Gopalkrishna Laxman Chandratraya Gold Medal" | Shri. Prashant Mani Karki, |
| 10. | "Late Principal Ranglar Gopalkrishna Laxman Chandratraya Gold Medal" | Shri. Shroff Piyush Ravindra, |
| 11. | "Late Principal Ranglar Gopalkrishna Laxman Chandratraya Gold Medal" | Smt. Khan Lubna Mohammed Hanif |
| 12. | "Late Principal Ranglar Gopalkrishna Laxman Chandratraya Gold Medal" | Smt. Shewale Jyoti Vijaykumar |
| 13. | "Shri Purushottam Narayan Bhogate Gold Medal" | |
| 14. | "Late Principal Ranglar Gopalkrishna Laxman Chandratraya Gold Medal" | Smt. Ahuja Anuradha Khushiram |
| 15. | "Damodar Ganesh Ramdasi Gold Medal" | |
| 16. | "Pandit G.M.Joshi Memorial Gold Medal" | |
| **4. FACULTY OF LAW** | | |
| 1. | " Late Nani A. Palkhiwala Gold Medal" | Shri. Dhirajkumar Kishorkumar Totala |
| 2. | " The P. H. Kothadia Gold Medal " | |
| 3. | "The Vitthalpant Tulpule Gold Medal" | Smt. Sule Shweta Atul |
| 4. | " The Late Radhabai Govind Salvi Gold Medal" | |
| 5. | " The P. H. Kothadia Gold Medal " | Smt. Jadhav Sharayu Bhausaheb |
| 6. | " The P. H. Kothadia Gold Medal " | Shri. Maharnawar Shivaji Dnyanoba |
| 7. | " The Namdar Gopalkrushna Gokhale Gold Medal " | Shri. Khatri Saurabh Satyapal |
| **5. FACULTY OF MEDICINE** | | |
| 1. | " The Late Nirmala Bala Chakraborty Gold Medal" | Shri. Shah Sanket Ravikant |
| 2. | "The Hari Malini Joshi Gold Medal" | Shri. Sanjay Panda |
| 3. | "The Late Dr. G.J. Paranjape Gold Medal" | Shri. Gupta Ravneesh Ramkishan |
| 4. | "Dr. Y.M. Bhende Gold Medal" | Smt. Divya Shelly |
| 5. | "Dr. A.D. Patwardhan Gold Medal" | Smt. Prasanth Baswati |
| 6. | "Dr. K.H. Sancheti Gold Medal" | Shri. Joshi Shripad Udhavrao |
| **6. FACULTY OF ENGINEERING** | | |
| 1. | " The P. S. Sharangpani Gold Medal " | Shri. Patil Mayur Subhash |
| 2. | " Dr. D. Y. Patil Gold Medal " | Smt. Tadpatrikar Siddhi Ram |
| 3. | " Dr. D. Y. Patil Gold Medal " | Smt. Harpreet Kaur |
| 4. | " Late Shri Mandar Shripad Sant Gold Medal " | |
| 5. | " The Late Shri Govind Kashinath Wani Gold Medal " | Smt. Singhal Chetna |
| 6. | " Tech. M. Fellow Award Tech. Mahindra Ltd. Gold Medal" | Shri. Prasad Jitendra Jagdish |
| 7. | " Kumari Nayana Murlidhar Roda Memorial Gold Medal " | Shri. Inamdar Aditya Satish |
| **7. FACULTY OF COMMERCE** | | |
| 1. | "डॉ. प्र. चि. शेजवलकर अमृतमहोत्सव सुवर्णपदक" | Shri Bathiya Aditya Subhash |
| **8. FACULTY OF MANAGEMENT** | | |
| 1. | " The Venkateshwara Hatcheries Ltd. Gold Medal " | Shri. Adhalakha Rohan Chandu |
| 2. | " The Hari Malini Joshi Gold Medal" | |
| 3. | " Cummins Gold Medal in International Business Management " | |
| 4. | "डॉ. प्र. चि. शेजवलकर अमृतमहोत्सव सुवर्णपदक " | |
| 5. | "Prof. Dr. Subhash Waman Bhave Gold Medal" | Smt. Jayshree |
| 6. | "Late Sushama Chandrashekhar Chitale Gold Medal" | Smt. Verma Ruchi Ashok Kumar |
| **9. FACULTY OF PHARMACY** | | |
| 1. | " Rupchand Bora Pharmacy Gold Medal" | Chanekar Almas Mohammed Iqbal |
| **10. FACULTY OF EDUCATION** | | |
| 1. | "Late Principal S.M. Thigale Gold Medal" | Smt. Mohol Surekha Ramchandra |
| 2. | "डॉ. व. झा. साळी सुवर्णपदक" | Smt. Mache Prachi Haribhau |
| **11. FACULTY OF PHYSICAL EDUCATION** | | |
| 1. | " Late Principal M.G. Patwardhan Gold Medal " | Smt. Pathare Vidya Dattatraya |
| 2. | "डॉ. पद्माकर महादेव आलेगांवकर सुवर्णपदक" | |

## बिल्लाडे व ससाणे यांना सुवर्ण पदक प्रदान :

पुणे विद्यापीठाचा १०३ वा पदवीप्रदान समारंभ शनिवार, दिनांक ०२ जानेवारी, २०१० रोजी संपन्न झाला. या पदवीप्रदान समारंभात संगमनेर महाविद्यालयाच्या श्री. प्रसन्न बिल्लाडे याला 'ह.भ.प. शेलारमामा सुर्वणपदक' तर आकुर्डी येथील प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालयाच्या कु. स्वाती ससाणे हिला 'त्यागमुर्ती सरस्वती रा. शेलार सुर्वणपदक' प्रदान करण्यात आले.

आपणास माझा सा. नमस्कार. मी कु. कविता आर. मोहिते राहणार नाशिक. मी. आपल्या युनिव्हर्सिटी कडून मागील वर्षी स्पर्धा खेळले असून माझ्या पायाला त्या स्पर्धेत मार लागला. माझ्या गुडघ्याचे ऑपरेशन दि. ०९/०५/२००९ रोजी झाले. मी आपल्या मदतीसाठी अर्ज दिला होता की, मला आपल्या युनिव्हर्सिटीतून मदत मिळावी. मला तुमची मदत मिळाली रु. १५,००० (पंधरा हजार रुपये) मी आपल्या सर्वाची फार आभारी आहे. व सदैव ऋणी राहील. पुन्हा एकदा मी तुमचे उपकार मानते. कबड्डी ह्या खेळासाठी माझी निवड झाली होती.

**कु. कविता आर. मोहिते, के.टी.एच.एम महाविद्यालय, नाशिक**

## लेट जस्टिस गजेंद्रगडकर अभिरुप न्यायालय स्पर्धा :

विद्यार्थी कल्याण मंडळ व पुणे विद्यापीठ विधी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने लेट जस्टिस गजेंद्रगडकर अभिरुप न्यायालय स्पर्धेचे आयोजन दिनांक २४ सप्टेंबर, २००९ रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेत पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हयांतून १६ महाविद्यालयांचे संघ सहभागी झाले. या स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे

प्रथम क्रमांक : इंडियन लॉ सोसायटीचे, विधी महाविद्यालय, पुणे

द्वितीय क्रमांक : डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे विधी महाविद्यालय, पुणे

तृतीय क्रमांक : डॉ. डी. वाय पाटील विधी महाविद्यालय, पिंपरी, पुणे

## पुणे विद्यापीठात कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती साजरी :


पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळामार्फत दिनांक २२ सप्टेंबर, २००९ रोजी संत नामदेव सभागृह येथे 'कमवा व शिका' योजनेचे आद्यप्रवर्तक कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती मा. प्रभारी कुलगुरु डॉ. अरूण अडसूळ यांच्या उपस्थितित साजरी करण्यात आली. यावेळी संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ, कार्यक्रम समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना, समन्वयक कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना विद्यापीठ परिसर, विविध विभागांतील विभागप्रमुख, प्राध्यापक व 'कमवा व शिका' योजनेत सहभागी असलेले सुमारे ४०० विद्यार्थी उपस्थित होते.

## शारीरिक शिक्षणशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ :

### • संशोधन कार्यशाळा

शारीरिक शिक्षणशास्त्र विद्याशाखेअंतर्गत विभागाने सर्व मार्गदर्शक, प्राध्यापक व शारीरिक शिक्षण संचालकांकरीता संशोधनातील गुणवत्ता सुधारण्यासाठी दिनांक ३१ ऑक्टोबर, २००९ रोजी "संशोधन कार्यशाळेचे" आयोजन केले होते. सदर कार्यशाळेचे उद्‌घाटन डॉ. पंडीत विद्यासागर, यांनी केले. सदर कार्यशाळेसाठी प्राध्यापक, मार्गदर्शक व शारीरिक शिक्षण संचालक असे २५ जणांनी व विभागातील २० विद्यार्थी असे एकुण ४५ जणांनी सहभाग घेतला.

### • आरोग्य जागृतीबाबत उपक्रम



दिनांक २९ ऑगस्ट, २००९ रोजी विभागाने हॉकीचे जादुगार कै. मेजर ध्यानचंद यांच्या स्मृतीदिनानिमित्त खुले "आरोग्य तपासणी शिबीर" आयोजित केले होते. विद्यापीठातील ६०० विद्यार्थी व शिक्षक – शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शिबीराचा लाभ घेतला. शिबीरामध्ये आरोग्य संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. शिबीरामध्ये विभागातील एम. एड. (शारीरिक शिक्षण) च्या विद्यार्थ्यांनी आरोग्य तपासणी केली. या शिबीराचा उद्देश पुणे विद्यापीठ व परिसरातील नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागृती निर्माण करणे हा होता. सदर शिबीर विभागामध्ये, आदर्श कॅन्टीन, भोजनालय व प्रकाशन विभाग अशा चार ठिकाणी आयोजित केले होते. या शिबीराला नागरिकांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. आरोग्य तपासणी शिबीरामध्ये विद्यार्थ्यांनी नागरिकांची आरोग्य तपासणी केली व त्याचे मुल्यमापन करून त्यांना आरोग्याबाबत सल्ले दिले. या शिबीराचा उपयोग नागरिकांबरोबरच विद्यार्थ्यांनादेखील प्रात्यक्षिक स्वरूपात विषय समजण्याकरिता देखील झाला. दिनांक ३ नोव्हेंबर,२००९ रोजी पुणे विद्यापीठातील ॲकेडेमिक स्टाफ कॉलेज येथे उद्‌बोधन वर्गामध्ये सहभागी झालेल्या ३० जणांची आरोग्य तपासणी केली. आरोग्य तपासणी एम. एड. (शारीरिक शिक्षण) व्दितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी केली. या तपासणीचे मुल्यमापन केले. त्यानंतर दिनांक ४ नोव्हेंबर, २००९ रोजी मा. विभागप्रमुख यांनी आरोग्याबाबत मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनातून प्रेरणा घेऊन यातील १० सदस्य व्यायाम प्रशिक्षणाकरीता नियमितपणे सकाळी ३० मिनिटे विद्यापीठ क्रीडांगणावर येत होते. या सदस्यांसाठी योगासने, प्राणायाम, ताकदीचे व्यायामप्रकार, चालणे व इतर मुलभूत व्यायामप्रकार विद्यार्थ्यांव्दारे योग्य पध्दतीने घेण्यात आले.

### • सायकल सहल



पर्यावरणविषयी जागृती निर्माण करण्यासाठी विभागाने दिनांक ६ व ७ नोव्हेंबर, २००९ रोजी विद्यापीठ ते पानशेत–वरसगाव धरणक्षेत्र (६० कि. मी.) येथे "सायकल सहलीचे" आयोजन केले होते. यामध्ये एम. एड. (शारीरिक शिक्षण) चे ४५ विद्यार्थी व विभागातील प्राध्यापक श्री. विष्णू पेठकर, श्री. दिपक घोळे, कु. स्नेहल भिसे मिळून एकूण ४८ जणांनी सहभाग घेतला. या सहलीचे आयोजन साहसी क्रीडा संघटनेचे सचिव, श्री. कल्पेश भागवत व शारीरिक शिक्षणशास्त्र विभाग यांच्यामार्फत केले. या उपक्रमात सहभागी सर्वांना मा. विभागप्रमुख यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आली.

### • इतर विशेष घडामोडी

१. शारीरिक शिक्षणशास्त्र विभागातील एम.एड. (शारिरिक शिक्षण) चे विद्यार्थी मोहन झुंजे–पाटील हे मल्लखांबाच्या प्रात्यक्षिकांकरिता युरोप दौऱ्यावर सहा महिन्यांसाठी गेले आहेत. सदर दौऱ्यात "मल्लखांब" या भारतीय खेळाचा प्रचार व प्रसार करणे हे उद्दिष्टे ठेवले आहे.

२. शारीरिक शिक्षणशास्त्र विभागातील संदीप वानखेडे हे "योग प्रशिक्षक" म्हणून उझबेकिस्तान येथील लालबहादूर शास्त्री भारतीय सांस्कृतिक मंडळ या संस्थेत तीन वर्षांसाठी निवड होऊन गेले आहेत.

३. दिनांक २० ऑगस्ट, २००९ रोजी विभागाला व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी भेट दिली. सदर भेटीमध्ये सदस्यांनी विभागाच्या कामकाजाची, तसेच विभागात असलेल्या साहित्यांची, क्रीडा साहित्यांची, ग्रंथालयातील पुस्तकांची व विभागाने स्वतंत्र स्थापन केलेल्या संगणक कक्षाची पाहणी केली. तसेच मा. विभागप्रमुख यांनी या सदस्यांसमोर विभागाची ध्येय व उद्दिष्टे यांची मांडणी केली. तसेच मुंगेर येथील बिहार योग शाळेला दिलेल्या भेटीचे निवेदन केले.

## Umesh Singh gets President of India's recognition:



Umesh Kumar Singh, Masters student in the Department of English, University of Pune and creative writer got the Hon'ble President of India's recognition and Best wishes for his novel- "The Warrior Returns".


Warrior Returns is an adventurous journey of a young soldier who depicts extreme level of Patriotism wrapped with the high emotions of love and passion.

Earlier in Jan. 2009, Umesh was awarded at the national level for his short story - "The Cheater". At the moment four stories of the young writer : A Sunday: for the Two Eyes, The Gurcedakshina, 9604382396 and Turn the Table are available on line at :- www.muscindia.com



पुणे विद्यापीठाच्या वणिज्य विभागाच्या इमारतीचे भूमिपूजन प्रभारी कुलगुरु डॉ. अरुण अडसूळ यांचे शुभहस्ते व अधिष्ठाता (वणिज्य) डॉ. बाबासाहेब सांगळे यांच्या प्रमुख उपस्थितित संपन्न झाले. यावेळी वाणिज्य विभाग प्रमुख, डॉ. एस. एस. कप्तान व अन्य मान्यवर मोठया संख्येने उपस्थित होते.

## They Just Clicked



Rohan Raut
(BE IT)



Dattaprasad Patil
(BE IT)



Ayush Mediratta
(BE comp)

Recently KPIT Cummins, a leading software development company, conducted a national level programming competition named WidUs (Widget Design with University Student). University students competed against each other to create the best widget. The entire event took place through Facebook.

WidUs was designed to give university student's direct access to the IT industry.

Three students, Ayush Mediratta (BE Comp.), Rohan Raut (BE IT) and Dattaprasad Patil (BE IT) from JSPM's Rajarshi Shahu College of Engineering. Tathawade, Pune participated in the event and they were 2nd runner up in the overall event.

They developed a wiget, named jUSt cLik. The main function of jUSt cLik was to categories and store links to various websites (favorites in case of internet browsers). Along with links it also had an address book. All the data was personalized to the user logged in to the Windows. The idea was very simple yet innovative.

Soon WidUs winners will be invited to KPIT Cummins for the WidUs Leadership Conference. During the conference WidUs winners will meet with KPIT Cummins CEO and members of the leadership team for tea and refreshments. Students will have the unique opportunity to discuss current issues concerning the IT industry with the leaders of KPIT Cummins. There will also be an open Question and Answer session in which specific interests will be addressed. WidUs winners will be interviewed about their widget, goals and experience at KPIT Cummins. The interviews will be featured on the CEO Blog, website, Facebook, Twitter, KPIT Cummins monthly newsletter and internal blog. WidUs winner's widgets will be available for download on all KPIT Cummins online mediums. Founder Secretary of JSPM Prof. T. J. Sawant, Principal (RSCOE) Dr. D. S. Bormane, and Head of Departments appreciated the efforts of their students.

**Prof. Nisha V. Kimmatkar,**


## Teachers' Day Celebration at GHRIET

G.H.Raisoni Institute of Engineering and Technology; Wagholi celebrated Teachers' Day on 5th of September 2009. Prof. Jagdeesh Chinchore, Secretary of Progressive Education Society, Pune was the Chief Guest. At the outset Dr.R.D.Kharadkar, Principal of GHRIET, Pune welcomed Prof. Chinchore and introduced him. GHRIET arranged speech and documentary competitions to mark the event. The students presented specially prepared documentaries on the life of Dr. Sarvapalli Radhakrishnan and also delivered speeches on the role of teacher in the life of students. Mr. Ajit Tatiya, Director of Raisoni felicitated Prof. Chinchore who stressed the need of application oriented engineering education for the Benefit of the common man . He also told that teachers should continuously update the subject knowledge and work hard to mold the carrier of students. The winners of the Competitions got prizes at the hands of the Chief Guest. Miss. Vandana of T. E. (Computer) proposed the vote of thanks.

## माईड स्पार्क : अभियांत्रिकी संशोधन प्रकल्प

विद्यार्थी कल्याण मंडळ व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ९ ते ११ ऑक्टोबर, २००९ याकाळात 'माईड स्पार्क' या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध राज्यांतील अभियांत्रिकी महाविद्यालयांतून सुमारे १२०० विद्यार्थी–विद्यार्थीनींनी अभियांत्रिकी संशोधन प्रकल्प सादर केले. पुणे विद्यापीठाच्या सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयातील सुमारे १०,००० विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले होते.

## 'अश्वमेध' स्पर्धेत पुणे विद्यापीठास सर्वसाधारण विजेतेपद :




महाराष्ट्र राज्याचे मा. राज्यपाल यांचे प्रेरणेने आयोजित कृषि व अकृषि आंतर विद्यापीठ १३ वी अश्वमेघ क्रीडा स्पर्धा दिनांक २६ नोव्हेंबर ते १ डिसेंबर, २००९ या कालावधीत डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली येथे संपन्न झाली. या स्पर्धेत पुणे विद्यापीठाच्या संघास खालीलप्रमाणे नैपुण्य मिळाले आहे.

सांघिक क्रीडाप्रकारात बास्केटबॉल (मुले), बास्केटबॉल (मुली), कबड्डी (मुली) या संघास प्रथम क्रमांक कबड्डी (मुले), खो–खो (मुली) संघास व्दितीय क्रमांक तर खो–खो (मुले), व्हॉलीबॉल (मुली) संघाने तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. कु. दिपिका जोसेफ (कबड्डी) व कु. श्वेता मुंदडा (बास्केटबॉल) तसेच कु. सायली द्रविड, कु. दत्तात्रय झोडगे व कु. अनिल पवार (अॅथलेटिक्स) या पुणे विद्यापीठाच्या खेळाडूंना स्पर्धेतील उत्कृष्ठ खेळाडू म्हणून गौरविण्यात आले आहे. वैयक्तिक क्रीडाप्रकारा अंतर्गत मैदानी स्पर्धेत मुलांनी ७ सुवर्णपदके, ३ रौप्यपदके व मुलींनी ३ सुवर्णपदके, ३ रौप्यपदके व ६ कांस्यपदके प्राप्त केली आहेत. या स्पर्धेत ३१० गुण मिळवून सलग दुसऱ्यांदा पुणे विद्यापीठाच्या संघाने सर्वसाधारण विजेतेपद मिळविले आहे. सर्व गुणवंत खेळांडूचे प्रभारी कुलगुरु डॉ.अरुण अडसूळ यांनी अभिनंदन केले.

## AIT Students excelled in University Exams :

The students of ARMY INSTITUTE OF TECHNOLOGY, DIGHI HILLS, Pune have excelled in the university exams by securing positions in the top ten ranks. Garima Tuteja (BE IT),Chetna Singhal (BE E&TC),Sonali Yadav (BE Comp), Jolene Singh (SE E&TC) have topped the University in first Five Ranks in 2007-08. Meghna Raman of Computer Engineering has topped the University SE(2007-08) as well as in TE(2008-09).If the students secure First or Second position in the university they are awarded with Rs.10,000/-. The students are appreciated and encouraged with various scholarships like HORIZON SCHOLARSHIP, TATA and Express and Merit and Means based on their academic performance. Shantanu Shekhar and Prateek Singh of BE Comp belled the CAT 08 with brilliant percentiles of 99.95% and 99.93%.

## UN acknowledges Rights of the Mentally Disabled




The Indian Law Society's Law College, Pune had organised a series of lectures in the fond memory of Late G. V. Pandit. This lecture series was marked by several enlightening sessions. The paramount among them being the one held on World Mental Health Day. The ILS Law College fraternity involving Vaijayanti Joshi, Principal and Dr. Deepa Paturkar, faculty were the pivotal elements in organising this stint. Additionally dignitaries and bigwigs from Ireland and Israel made the event all the more elevating. The objective was to explicate the recent moves about the United Nations Convention on the Rights of Mentally Disabled Persons directed towards a 'Unified Field Theory' and mental health.

Professor Gerard Quinn, Director, Centre for Disability Law and Policy, National University of Ireland, Galway, was the Guest of Honour. He effectively threw light on the agenda of the UN with regards to the rights of mentally disabled persons, the protocol to be implemented and the general ideas behind the genesis of this initiative. Professor Quinn remarked, "The outcome of the convention was fruitful. It is critical to urge people round the globe to acknowledge social solidarity. The Convention effectively laid down the rights of the mentally disabled and proposed a unified field theory which means the consolidation of the different types of populace into a single framework of humanity."

The session was being presided over by Dr. Itzhak Levav, Consultant, World Health Organization and Special Advisor to Israel's Health Ministry.

## प्रा. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी, 'दोन दिवसीय गिर्यारोहण प्रशिक्षण शिबिर'



दि. १ व २ नोव्हेंबर, २००९ रोजी लेण्याद्री व शिवनेरी, येथे दोन दिवसीय गिर्यारोहण प्रशिक्षण शिबीराचे आयोजन पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ व प्रा. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

दि. १ नोव्हेंबर, २००९ रोजी लेण्याद्री येथे सायं ४.०० वाजता गिर्यारोहण प्रशिक्षण शिबीराचे उद्घाटन डॉ. संभाजी पठारे व प्राचार्य डॉ. के. डी. पुराणे यांचे हस्ते झाले. पाहुण्यांचे स्वागत व प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितिन घोरपडे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. तुषार शितोळे, जिल्हा समन्वयक पुणे शहर यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. के. व्ही. जाधव, विद्यार्थी कल्याण अधिकारी यांनी केले.

पुणे जिल्हयातील विविध महाविद्यालयातील ६० विद्यार्थी या गिर्यारोहण प्रशिक्षण शिबीरामध्ये सहभागी झाले होते. शिबीरार्थींना गिर्यारोहणविषयी स्लाईड शो श्री. श्रीपाद सपकाळ व सहकारी यांनी दाखविला.

दि. २ नोव्हेंबर, २००९ रोजी शिवनेरी येथे श्रीपाद सपकाळ यांनी गिर्यारोहण प्रशिक्षण, रॅपलिंग कसे करावे याबाबतचे प्रात्यक्षिक करून दाखविले. प्रत्येक शिबीरार्थीने रॅपलिंग केले. त्यामुळे विद्यार्थ्यांमधील गिर्यारोहणासंबंधी असणारे गैरसमज व भीती दूर होवून त्यांचा आत्मविश्वास वाढला.समारोप समारंभप्रसंगी शिबीरार्थींनी आपले शिबीरातील अनुभव कथन केले.

## पुणे विद्यापीठ भूमाहितीशास्त्र विभागातील विजय एस. चव्हाण यांची टाटा जागृती यात्रा - २००९ साठी निवड

पुणे विद्यापीठाच्या भूमाहितीशास्त्र विभागात व्दितीय वर्षात शिकत असलेल्या विजय एस. चव्हाण यांची टाटा जागृती यात्रा – २००९ भारतभ्रमंतीसाठी निवड करण्यात आली आहे. विजय एस. चव्हाण हा विद्यार्थी एन एस एस चा स्वयंसेवक असून संपूर्ण भारतातील एकूण ३५० विद्यार्थी सदर यात्रेसाठी परीक्षेव्दारे निवडण्यात आले आहेत.

## शमिका डामसे हिला कराटे स्पर्धेत प्रथम क्रमांक



क्रीडा व युवक सेवा संचनालय, महाराष्ट्र राज्य व जिल्हा क्रीडा परिषद, पुणे आयोजित बारामती येथे दि. १४ व १५ नोव्हेंबर, २००९ रोजी झालेल्या जिल्हास्तर कराटे स्पर्धेमध्ये श्री शिव छत्रपती महाविद्यालयातील कु. शमिका पाराजी डामसे हिने ४५ किलो गटात प्रथम क्रमांक मिळविला असून तिची पुणे विभागात निवड झाली आहे. तसेच महाविद्यालयातील इतर कराटे खेळाडू कु. विद्या दिलीप गरड ५० किलोगट, द्वितीय क्रमांक, कु. प्रमिला रामचंद्र भोर ५० किलोगट, तृतीय क्रमांक, श्री. प्रमोद कैलास हाटकर ५० किलोगट, द्वितीय क्रमांक मिळविलेला आहे. कराटे स्पर्धेमध्ये प्रथमच महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी भाग घेऊन प्राविण्य मिळविल्याने महाविद्यालयामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

जुन्नर तालुका शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष ॲड. चंद्रकांत डहाळे व महाविद्यालयाचे प्राचार्य के.डी.पुराणे यांनी प्राविण्य मिळविलेल्या खेळांडूचे अभिनंदन केले.

कराटे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे कराटे विभाग प्रमुख प्रा. किशोर चौरे, संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. चंद्रकांत डहाळे, जिमखाना विभागाचे प्रमुख, प्रा. पी. बी. कबाडी, प्रा. विकास वाघमारे, ज्युनिअर कॉलेजचे उप–प्राचार्य प्रा. व्ही. बी. कुलकर्णी, यांनी विशेष सहकार्य केले.

## RAINBOW - 2009


RAINBOW 2009, the annual gathering day of ATSS IICMR, Nigdi, (Pune) was celebrated at "Ramkrishna More Sabhagraha, Chinchwad".

The annual day was graced by the presence of Chief Guest Mr. Jeetendra Sharma, Category Manager, Kimberly-Clark Asia Pacific Region & Mr. M.D. Jambhekar, Chairman ATSS, Dr. Abhay Kulkarni, Director-IICMR., Prof. Deepali Sawai, Director(Tech), Dr. Ashwini Kulkarni, Director (Placement).Mr. Sharma mentioned in his speech that learning the managerial skills in practical way enhances the level of quality education. He congratulated IICMR team for bringing out this concept in reality, by organising Rainbow 2009.

Students have performed several cultural programmes during the function. Winners of various competitions were awarded by trophy & medals. Mr. Deepesh Nanavati MCA 3rd year & Mr. M. Shahanawaz MBA 2nd year students were awarded as "Best outgoing students". "Academic Excellence" award was given to University MCA rank holder Mr. Vinod Agarwal.

## इंद्रधनुष्य, २००९

कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठात ५ ते ९ नोव्हेंबर, २००९ या कालावधीत श्री. एस. सी. जमीर, महामहिम राज्यपाल व कुलपती, महाराष्ट्र राज्य, यांच्या आदेशान्वये आयोजित केलेल्या 'इंद्रधनुष्य' या राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ युवक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पुणे विद्यापीठाच्या ४० स्पर्धकांनी या युवक महोत्सवात भाग घेतला. बक्षिस वितरण समारंभाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ अभिनेते रमेश देव उपस्थित होते. या युवक महोत्सवात पुणे विद्यापीठ संघास हीज हायनेस जगद्गुरू चंद्रशेखरेंद्र सरस्वती फाईन आर्टस् फिरता चषक व खालील ३ कलाप्रकारांमध्ये ९ विद्यार्थ्यांना वैयक्तिक पारितोषिके मिळाली.



**प्रथम क्रमांक :**

पोस्टर मेकिंग : अमित पाटील
(भारती विद्यापीठाचे, भारती कॉलेज ऑफ फाईन आर्ट, धनकवडी)

**प्रथम क्रमांक :**

इन्स्टॉलेशन : प्रसाद अजगोलकर
(भारती विद्यापीठाचे, भारती कॉलेज ऑफ फाईन आर्ट, धनकवडी)
संदीप डोंगरे
(भारती विद्यापीठाचे, भारती कॉलेज ऑफ फाईन आर्ट, धनकवडी)
राधेशाम ढमाळ
(भारती विद्यापीठाचे, भारती कॉलेज ऑफ फाईन आर्ट, धनकवडी)
हर्षित बोद्रे
(भारती विद्यापीठाचे, भारती कॉलेज ऑफ फाईन आर्ट, धनकवडी)

**द्वितीय क्रमांक :**

शास्त्रीय नृत्य : अमिरा पाटणकर
(ललित कला केंद्र, पुणे विद्यापीठ)
शंतनु कुलकर्णी
शशिकांत भन्साळी
विनय रामदासन

## विद्यार्थ्यांनी समाजाच्या अपेक्षा पूर्ण कराव्यात. : डॉ. अरूण अडसूळ

समाज शिक्षण क्षेत्राकडून अपेक्षा करतो आहे ती अपेक्षा पूर्ण करणे गरजेचे आहे असे मत पुणे विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. अरूण अडसूळ यांनी येथे व्यक्त केले.

पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. १७ नोव्हें ०९ रोजी कार्यक्रम अधिकाऱ्यांची कार्यशाळा 'श्रमसंस्कार शिबिर' पुणे विद्यापीठात आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेचे उद्घाटन पुणे विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. अरूण अडसूळ यांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या मार्गदर्शनात ते पुढे म्हणाले की, समाजाची प्रगती होत असतांना ती दोन पद्धतीने होते, 'एक सांस्कृतिक व दुसरी आर्थिक'. आर्थिक बाबतीत प्रगती होण्यासाठी राजकीय व औद्योगिक गोष्टी असाव्या लागतात तर सांस्कृतिक विकास जोपासण्यासाठी शिक्षण क्षेत्राचे योगदान महत्वाचे असते. खरे तर शिक्षण क्षेत्र देशाच्या आर्थिक विकासातही भरीव कामगिरी करू शकते. संशोधनातून उत्पादकता वाढवून त्याचा समाजासाठी उपयोग करण्यासाठी प्राध्यापकांनी पुढाकार घेतला पाहिजे. संशोधनासाठी प्राध्यापकांना हवी ती सर्व मदत विद्यापीठ करेल असे ते म्हणाले. याप्रसंगी रा.से.यो. चे पुणे विद्यापीठाचे कार्यक्रम समन्वयक, डॉ. संजय चाकणे यांनी शिबिर कशाप्रकारे असावे, शिबिराच्या नियोजनात कोणकोणते मुद्दे यावेत व हे शिबिर उत्तम पद्धतीने कशाप्रकारे आयोजित करता येईल. या पद्धतीचे मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ. गर्दे यांनी 'Erasmus Mundus' या विषयी माहिती दिली. व विद्यार्थी तसेच प्राध्यापकांना संशोधनासाठी युरोपियन देशात जाण्याची संधी कशाप्रकारे उपलब्ध आहे याविषयी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हयातील ४०० रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते. यावेळी रा.से.यो. विशेष शिबिरासाठी एकूण ५५,००,०००/– रूपयांच्या धनादेशाचे महाविद्यालयांना वाटप करण्यात आले. या प्रसंगी रासेयोचे जिल्हा समन्वयक पुणे डॉ. शाकीरा इनामदार, पुणे ग्रामीण प्रा. राजकुमार रिकामे, नाशिक प्रा. बी. जे. भंडारे, अहमदनगर प्रा. मालुंजकर इत्यादी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्र संचालन प्रा. मालुंजकर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. भंडारे यांनी केले.

## पश्चिम विभागीय युवक महोत्सव, २००९

अखिल भारतीय विश्वविद्यालय संघ, नवी दिल्ली यांच्या आदेशान्वये २५व्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठीय युवक महोत्सवाचे आयोजन मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे दिनांक १६ ते २० डिसेंबर, २००९ या कालावधीत करण्यात आले होते. सदर युवक महोत्सवामध्ये महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, छत्तीसगड, मध्य प्रदेश या ५ राज्यांतून ३१ विद्यापीठांच्या संघानी सहभाग घेतला होता. पुणे विद्यापीठाच्या ४० स्पर्धकांनी या युवक महोत्सवात भाग घेतला. या युवक महोत्सवात पुणे विद्यापीठ संघास सांस्कृतिक फेरीसह एकूण ६ कलाप्रकारांमध्ये १२ विद्यार्थ्यांना पारितोषिके मिळाली.

**प्रथम क्रमांक :**

ऑन द स्पॉट पेंटिंग : राधेशाम ढमाळ
(भारती विद्यापीठाचे, भारती कॉलेज ऑफ फाईन आर्ट, धनकवडी)

**प्रथम क्रमांक :**

स्पॉट फोटोग्राफी : संदीप डोंगरे
(भारती विद्यापीठाचे, भारती कॉलेज ऑफ फाईन आर्ट, धनकवडी)

**द्वितीय क्रमांक :**

सांस्कृतिक फेरी : पुणे विद्यापीठ संघ

**द्वितीय क्रमांक :**

शास्त्रीय नृत्य : अमिरा पाटणकर
शितल कपोले
शेखर कुंभोजकर
प्रफुल्ल काळे
(ललित कला केंद्र, पुणे विद्यापीठ)

**तृतीय क्रमांक :**

शास्त्रीय वाद्य वादन (तबला) : प्रफुल्ल काळे
(ललित कला केंद्र, पुणे विद्यापीठ)
हरिश कुलकर्णी
(ललित कला केंद्र, पुणे विद्यापीठ)

**तृतीय क्रमांक :**

इन्स्ट्रोलेशन : प्रसाद अजगोलकर
(भारती विद्यापीठाचे, भारती कॉलेज ऑफ फाईन आर्ट, धनकवडी)
संदीप डोंगरे
(भारती विद्यापीठाचे, भारती कॉलेज ऑफ फाईन आर्ट, धनकवडी)
राधेशाम ढमाळ
(भारती विद्यापीठाचे, भारती कॉलेज ऑफ फाईन आर्ट, धनकवडी)
अमित पाटील
(भारती विद्यापीठाचे, भारती कॉलेज ऑफ फाईन आर्ट, धनकवडी)

**पश्चिम विभागीय युवक महोत्सवामधील प्रथम व द्वितीय क्रमांकाचे स्पर्धक हे एम. डी. विद्यापीठ, रोहतक, हरियाणा या ठिकाणी होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठीय युवक महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी पात्र झाले आहेत.**

या बक्षिस समारंभाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ अभिनेता सचिन खेडेकर, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु व उपाध्यक्ष, अखिल भारतीय विश्वविद्यालय संघ, नवी दिल्ली डॉ. पी. टी. चांदे, अखिल भारतीय विश्वविद्यालय संघ, नवी दिल्ली यांच्याद्वारे नियुक्त केलेले निरिक्षक डॉ. एस. एम. कांत, मृदुल निले, संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ, मुबई विद्यापीठ, चित्रपट निर्माते हरि बावेजा, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु, डॉ. चंद्रा कृष्णमूर्ती हे उपस्थित होते.

'चेतना' हा अंक चांगला आहे. या अंकाचे महत्व लक्षात घेता तो विभागातील विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध केलेला आहे. आपल्या नेतृत्वाखाली या अंकाचे नियोजन उत्कृष्ट झालेले आहे. आपणास मन:पूर्वक शुभेच्छा अंकाच्या प्रतिबद्दल धन्यवाद !

विभागप्रमुख,
**पर्यावरणशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ**

## डॉ. संभाजी पठारे यांची राज्यस्तरिय युवक महोत्सवाच्या निरीक्षण समितीचे प्रमुख म्हणून नियुक्ती :



महामहिम राज्यपाल व कुलपती श्री. एस. सी. जमीर यांच्या आदेशान्वये दिनांक ५ ते ९ नोव्हेंबर, २००९ या कालावधीत कोल्हापूर येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरिय युवक महोत्सवाच्या निरीक्षण समितीचे प्रमुख म्हणून विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. संभाजी पठारे यांची मा. राज्यपाल यांच्या कार्यालयातून नियुक्ती करण्यात आली होती.

## पुणे विद्यापीठाच्या संघाने कौटिल्यचषक पटकाविला :



दिनांक २०, ते २२ सप्टेंबर, २००९ रोजी नळेगाव, ता. चाकूर, जिल्हा लातूर येथे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय कौटिल्योत्सवामध्ये पुणे विद्यापीठाच्या संघाने कौटिल्यचषक पटकाविला आहे. सदर राज्यस्तरीय वक्तृत्व व काव्यवाचन स्पर्धेचे हे नववे वर्ष होते. यावर्षी स्पर्धेमध्ये महाराष्ट्राच्या विविध विद्यापीठांमधून एकूण ११० स्पर्धक आणि २२ संघ सहभागी झाले होते. त्यामध्ये पुणे विद्यापीठाच्या संघातील चेतन दीक्षित आणि अक्षय आगरकर या विद्यार्थ्यांनी कौटिल्यचषक व २५००/– रूपयांचे रोख पारितोषिक पटकावले. त्याचबरोबर चेतन दीक्षित याने वैयक्तीक काव्यवाचन स्पर्धेत ७००/– रुपयांचे दुसरे पारितोषिक तर उत्स्फूर्त भाषणामध्ये १०१/– रुपयांचे पारितोषिक पटकावले, तसेच संतोष विरकर याने वक्तृत्व स्पर्धेत ५००/– रुपयांचे उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले. विद्यार्थी कल्याण मंडळामार्फत या विद्यार्थ्यांची स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी पुणे विद्यापीठ संघात निवड करण्यात आली होती.

## देवळा महाविद्यालयाच्या 'बांधिलकी' नियतकालिकास प्रथम क्रमांक :

महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेकरिता संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांद्वारे सन २००८–०९ मध्ये प्रकाशित करण्यात आलेल्या व विद्यार्थी कल्याण मंडळ विभागास प्राप्त झालेल्या अंकांचे परीक्षण करून समितीने पुढीलप्रमाणे निकाल जाहीर केला :

### विद्यापीठ स्तर :

(प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ क्रमांकास
अनुक्रमे रु.१०,०००/–, रु.७,०००/–, रु.५,०००/– व रु.२,०००/– )

| | | |
|---|---|---|
| १) प्रथम क्रमांक : | बांधिलकी : | कर्मवीर रामरावजी आहेर, महाविद्यालय, देवळा, जि. नाशिक |
| २) द्वितीय क्रमांक : | सृजन : | सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे |
| ३) तृतीय क्रमांक : | अर्घ्य : | संगमनेर महाविद्यालय,संगमनेर, अहमदनगर |
| ४) चतुर्थ क्रमांक : | पिल्स ॲंड श्रील्स : | सेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी, सासवड. |

### विभागीय स्तर :

(प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकास
अनुक्रमे रु.५,०००/–, रु.३,०००/– व रु.२,०००/–)

**पुणे शहर :**

| | | |
|---|---|---|
| १) प्रथम क्रमांक : | सौरभ : | एम. आय. टी., कोथरुड, पुणे |
| २) द्वितीय क्रमांक : | माध्यम : | फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे |
| ३) तृतीय क्रमांक : | श्रीलेखा : | गरवारे वाणिज्य महाविद्यालय, पुणे |

**पुणे ग्रामीण :**

| | | |
|---|---|---|
| १) प्रथम क्रमांक : | वेध : | सिंहगड फार्मास्युटीकल सायन्स, लोणावळा |
| २) द्वितीय क्रमांक : | शारदीय : | शारदाबाई पवार महिला महाविद्यालय, शारदानगर,बारामती, जि. पुणे |
| ३) तृतीय क्रमांक : | शिवनेरी : | अण्णासाहेब आवटे महाविद्यालय,मंचर. |

**अहमदनगर :**

| | | |
|---|---|---|
| १) प्रथम क्रमांक: | अगस्त्य: | अगस्ती महाविद्यालय, अकोले. |
| २) द्वितीय क्रमांक : | तृषार्त : | न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, शेवगाव |
| ३) तृतीय क्रमांक : | स्पंदन : | न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स् कॉलेज, अहमदनगर |

**नाशिक :**

| | | |
|---|---|---|
| १) प्रथम क्रमांक : | अभिव्यक्ती : | कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, नाशिक |
| २) द्वितीय क्रमांक : | नक्षत्र : | लासलगाव महाविद्यालय, लासलगाव |
| ३) तृतीय क्रमांक : | फूटप्रिंटस : | जे. डी. सी. बिटको इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज्, नाशिक |

## शिक्षणेतर उपक्रमांतील सहभाग व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक :

पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाच्यावतीने शनिवार, दिनांक २८ नोव्हेंबर, २००९ रोजी, माजी कुलपती डॉ. पी. सी. अलेक्झांडर आंतरविद्यापीठीय मराठी वक्तृत्व स्पर्धेच्या अंतिम फेरीचे पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र विभागाच्या सभागृहात आयोजन करण्यात आले होते.

सदर स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य नंदकुमार निकम, अधिष्ठाता, मा. ॲड. रावसाहेब शिंदे, कार्याध्यक्ष, रयत शिक्षण संस्था व डॉ. संजय चाकणे यांच्या प्रमुख उपस्थितीत, व डॉ. अरुण अडसूळ, प्रभारी कुलगुरु, पुणे विद्यापीठ, यांच्या अध्यक्षतेखाली दीपप्रज्वलन करुन संपन्न झाले सदर स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील १५ विद्यापीठाच्या स्पर्धकांनी आपले वक्तृत्व सादर केले.



या राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षीय भाषण करतांना मा. कुलगुरू डॉ. अरूण अडसूळ म्हणाले की सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून त्यांचा शिक्षणेतर उपक्रमांमधील सहभागही तितकाच महत्त्वाचा आहे. समाजाला अनेक प्रकारच्या लोकांची गरज असते. यामध्ये शिक्षक, वैज्ञानिक, तंत्रज्ञ, खेळाडू, कवी, लेखक, कलाकार, उत्कृष्ट वक्ते, दिगदर्शक इत्यादींचा समावेश आहे. त्यामुळे अशा वक्तृत्व स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेणे आवश्यक आहे. यावेळी उद्घाटक म्हणून रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. रावसाहेब शिंदे उपस्थित होते. सदर वक्तृत्व स्पर्धेचा निकाल परीक्षकांनी पुढीलप्रमाणे जाहीर केला.

प्रथम क्रमांक : श्री. मधुकर मुकुंदराव पाटील, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

द्वितीय क्रमांक : श्री. आमोद नागपुरे, मुंबई विद्यापीठ, मुंबई

## समर्थ भारत अभियानांतर्गत विविध उपक्रम :
## दादा पाटील महाविद्यालय, कर्जत, जि. अहमदनगर

**वृक्षारोपन :** छात्रसेनेतर्फे कर्जतला शंभर झाडांची लागवड: रयत शिक्षण संस्थेच्या येथील दादा पाटील राजळे महाविद्यालयात राष्ट्रीय छात्रसेनेने समर्थ भारत अभियानांतर्गत 'एक छात्र–एक झाड' असा उपक्रम राबविला. या उपक्रमात कडुनिंबाची शंभर झाडे लावण्यात आली. वृक्षारोपणाचा सर्व खर्च कॅप्टन संजय चौधरी यांनी केला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी, अंडर ऑफिसर अभिजित कुलकर्णी व महेश लोंढे, तसेच क्वॉटर मास्टर भागवत बिटके व छात्रसैनिकांनी विशेष परिश्रम घेतले. उपक्रमाबद्दल बटालियन कमांडर लेफ्टनंट कर्नल एस. वाय. जाधव, प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड, सुभेदार मेजर पी. बी. दिघे व तुकाराम गिरमे यांनी उपक्रमाचे कौतुक केले.

**साहसी सायकल रॅली:** महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्रसेनेच्या वतीने क्रीडा दिनानिमित्त कर्जत ते करमाळा (कमलादेवी) पर्यंत साहसी एकता रॅली काढण्यात आली. कॅप्टन संजय चौधरी यांच्या मार्गदर्शनानुसार या रॅलीत ८० छात्र सैनिकांनी भाग घेतला होता.

## स्वाईन फ्लू जनजागृती मोहिम व रक्तदान शिबीर :



राष्ट्रीय छात्रसेना विभागाच्यावतीने स्वाईन फ्लूविषयी जनजागृती अभियानाचा प्रारंभ प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड यांच्या हस्ते झाला. समर्थ भारत अभियानांतर्गत स्वातंत्र्यदिनी रक्तदान शिबीराचे व स्वाईन फ्लू जनजागृती मोहिमेचे आयोजन कॅप्टन संजय चौधरी यांनी केले होते. रक्तदान शिबीरात ४१ छात्रसैनिकांनी रक्तदान केले. डॉ. अनिल बोरगे यांनी स्वाईन फ्लूच्या पार्श्वभूमीवर आवश्यक त्या सूचना केल्या. डॉ. एन. एस. गायकवाड यांच्या हस्ते स्वाईन फ्लू माहिती पत्रकाचे प्रकाशन करण्यात झाले.

## रयत शिक्षण संस्थेचे महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी

समर्थ भारत अभियानांतर्गत दतक खेडे मु. बेलज, ता मावळ जि. पुणे येथे दि. १५/११/२००९ रोजी महाविद्यालयाच्या वतीने मोठया प्रमाणावर राष्ट्रीय सेवा योजनेतील व इतर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मार्फत २०० वृक्षांचे वृक्षारोपन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयीन १२५ विद्यार्थी ५ प्राध्यापक व ग्रामस्थांनी कडुनिंब, हिरडा, बेहडा, चिंच, पळस, आपटा, अशा २०० विविध औषधी वनस्पतींचे व फळझाडांचे वृक्षारोपन करण्यात आले.

याशिवाय पूर्वी लागवड केलेल्या झाडांची आळी स्वच्छ करण्यात आली, खत पाणी घालण्यात आले. शिवाय बेलज गावातील प्राथमिक शाळेसमोर मैदान झाडून स्वच्छ करण्यात आले. शाळेच्या समोरील मैदानातील गवत काढण्यात आले. सर्व परिसर स्वच्छ करण्यात आला. सदर वृक्षरोपनं कार्यक्रमासाठी बेलज गावचे सर्व ग्रामस्थ मोठया संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण आंधळे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

## 'आदिवासी विद्यार्थी विकास : स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा' :



दिनांक ८ सप्टेंबर, २००९ रोजी 'आदिवासी विद्यार्थी विकास : स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन' कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. के. बी. पाटील यांचे हस्ते व मा. अॅड. शशिकांत पवार, अध्यक्ष, कळवण एज्युकेशन सोसायटी यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले. सदर समारंभप्रसंगी मा. श्री. इ. जी. भालेराव, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी दृकश्राव्य साधनांच्या आधारे महाराष्ट्र शासन व केंद्र शासन यांच्या आदिवासी विकासाच्या योजनांचा सविस्तर परिचय घडविला. प्रा. डॉ. एकनाथ पवार (प्रसिध्द लेखक) यांनी स्पर्धा परीक्षा तयारी, विविध वाचन क्षेत्रांचा निर्देश, स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासपध्दतीची तंत्रे, हस्तगत करायची कौशल्य, मूल्यमापनाच्या पध्दती, मुलाखत तंत्र, टिपणनिर्मिती, प्रेरणा व कृती कार्यक्रम यावर मार्गदर्शन केले.

स्पर्धा परीक्षा, करीअर आणि व्यक्तिमत्व विकास – मा. अविनाश धर्माधिकारी, संचालक, चाणक्य मंडळ यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले.

समारोप सत्रात मा. प्रभारी कुलगुरू डॉ. अरूण अडसूळ यांनी पुणे विद्यापीठाची भूमिका, विद्यार्थ्यांप्रती विद्यापीठाचे दायित्व आणि अपेक्षा, स्पर्धेचे युग, खिलाडू वृत्ती व प्रामाणिक कष्टांची आवश्यकता, खरे यश, ज्ञानाच्या प्रक्रियेतील श्रेयस आणि प्रेयस, समाजविकासासाठी चांगल्या माणसाची उपयुक्तता, स्वत:शील गुणांचा – क्षमतांचा शोध, ध्येयनिश्चिती व प्रयत्नदिशा कल्पनाशिलता, नवता व सर्जकता, स्पर्धायुगात स्वत:चे स्थाननिर्धारण संधी निर्मिणे, जिद्दीने संघर्ष संधीचे यशात रूपांतरण व आदिवासी विकास या विषयावर विस्तृत मार्गदर्शन केले.

समारोप सत्रात महाराष्ट्राचे आदिवासी विकास आयुक्त श्री. ज्ञानेश्वर राजूरकर यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या 'गिरीजा' या वार्षिक नियतकालिकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी डॉ. संभाजी पठारे, व डॉ. संजय चाकणे यांनीही मार्गदर्शन केले.

## Success of J. A. T. Student in Debate Competition



J. A. T. Mahila Mahavidyalaya's student Ms. Misbah Tarannum Aqueel Ahmed won 'Ladies' First Prize in the Debate Competition held by M. S. G. College, Malegaon. The topic was 'Nuclear Deal with America, Indeed is India's first Giant Step Towards Becoming a Superpower' She was awarded the prize at the auspicious hands of Ex. Chief Minister, Mr. Vilasraoji Deshmukh.

## कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कळवण
## विद्यार्थीनी आरोग्य विषयक मार्गदर्शन शिबिर :



पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाच्या सहकार्याने कळवण महाविद्यालयातील विद्यार्थीनींसाठी आरोग्यविषयक मार्गदर्शन शिबिराचे उद्घाटन ४ ऑक्टोबर, २००९ रोजी नाशिक येथील गोदावरी सहकारी बँकेच्या चेअरमन सौ. निलीमाताई पवार यांच्या शुभहस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन अॅड. शशिकांत पवार उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. रावसाहेब शिंदे यांनी केले.

डॉ. आर. बी. तुसे, वैद्यकिय अधीक्षक, उपजिल्हा रूग्णालय, कळवण यांचे 'आरोग्य संदर्भात घ्यावयाची काळजी' व 'स्वाइन फ्लू' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. याच शिबिरात महाविद्यालयातील ३०० विद्यार्थीनींची रक्तगट व हिमोग्लोबीन तपासणी करण्यात आली. तसेच ३३ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.

## न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स् कॉलेज, पारनेर ग्राम न्यायालयाचे उद्घाटन :



दिनांक २ ऑक्टोबर, २००९ रोजी न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स् कॉलेज, पारनेर दिवाणी न्यायालय पारनेर, वकील संघ पारनेर तथा राळेगणसिद्धी ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने पारनेर पंचायत समिती अंतर्गत ग्रामन्यायालय कायदा २००८ नुसार ग्राम न्यायालयाचे उद्घाटन ना. श्री. न्यायमूर्ती एस. बी. म्हसे, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या शुभहस्ते व ना. श्री. न्यायमूर्ती ए. एम. खानविलकर, उच्च न्यायालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या कार्यक्रमास समाजसेवक अण्णासाहेब हजारे, प्राचार्य शिवाजीराव देवढे, महाविद्यालयाचे प्राध्यापक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

## बी. डी. काळे महाविद्यालयात विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडाराचे उद्घाटन :



घोडेगाव येथील आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित बी. डी. काळे महाविद्यालयात विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडाराचे उद्घाटन पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. संभाजी पठारे यांच्या शुभहस्ते झाले. उद्घाटनप्रसंगी मा. डॉ. पठारे म्हणाले विद्यार्थी कल्याणासाठी विद्यार्थी ग्राहक भांडाराची कल्पना अतिशय चांगली असून विद्यार्थ्यांना अल्पदरात शैक्षणिक साधने उपलब्ध तर होतीलच. याशिवाय सहकाराचा संस्कार होईल. मी अनेक महाविद्यालयांना भेटी दिल्या असता फार थोडयाच महाविद्यालयात असा उपक्रम दिसला. घोडेगाव सारख्या दुर्गम भागातील या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सहकार व सहकार तत्वाची जाणीव व्हावी. या उद्देशाने या ग्राहक भांडाराची स्थापना करण्यात आली. या ग्राहक भांडारात विद्यार्थ्यांना स्वस्त व माफकदराने शैक्षणिक साधने विक्रीसाठी ठेवण्यात आली आहे. सदर भांडाराची रितसर नोंदणी झालेली आहे. उद्घाटन समारंभाच्याप्रसंगी प्राचार्य आय.बी. जाधव, चेअरमन प्रा. बी. एम. पवार, सचिव श्री. विनोद काळे, शिक्षक शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.

## Tree Plantation & Blood doanation Camp on AIT Campus :

150 NSS volunteers planted about 400 trees all over the campus. The saplings were donated by Tata Motors and their representative Mr Srirang Dhavale was also present on the occasion. Director Sir, Principal Madam, Heads of the Departments and some of the staff members also participated in this activity, which was a big motivation to the students. As a token of their appreciation, for this activity, Tata Motors gave the core NSS members, caps.

The blood donation camp was conducted on in the campus by AFMC. The response from the students was overwhelming. In all 111 donors from both, the staff and the students donated blood for Social Cause. AFMC also provided caps to the donors as a token of their appreciation.

## कर्मवीर रामरावजी आहेर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, देवळा, नाशिक

संत तुकाराम महाराजांच्या जन्म चतु:शताब्दी निमित्त देवळा महाविद्यालयाच्या 'बांधिलकी' या विशेषांकाचे प्रकाशन प्रभारी कुलगुरु डॉ. अरुण अडसूळ यांच्या हस्ते झाले. माणसामध्ये हव्यास वाढीला लागल्याच्या काळात संतवाड:मयाने निरामय मनाने समाज प्रबोधनाचे काम केले. त्याची आजही आवश्यकता आहे. ज्ञान, माहिती, तंत्रज्ञान यांच्या काळात सुखवस्तू जगण्याची हाव निर्माण झाल्याने सामाजिक मुल्यांची हेळसांड होत असते. तरुण मनांनी स्वयंस्फूर्तीने आयुष्य आणि देशही घडवावा असे प्रतिपादन पुणे विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु डॉ. अरुण अडसूळ यांनी 'बांधिलकी' या संत तुकाराम विशेषांकाच्या प्रकाशन समारंभात व्यक्त केले. आपल्या भाषणात तरुणाईशी संवाद साधताना डॉ. अडसूळ पुढे म्हणाले की ग्रामीण भाग, गरीबी, दु:खे, अडचणी अशा सबबी सांगण्यापेक्षा कर्तृत्व सिध्द करावे. गुणवत्ता – क्षमता सिध्द करावी. स्वयंस्फुर्तीने स्वप्ननिश्चिती करुन व्यक्तित्व फुलवावे, स्पर्धाशीलतेने खिलाडूवृत्ती जोपासावी. सकारात्मकदृष्टीने प्रयत्नशील राहावे. संत तुकारामाच्या अभंगांशी विद्यार्थ्यांनी स्वत:ला जोडून घेणे ही महत्वपूर्ण घटना बांधिलकी या नियतकालिकाने घडविली आहे.

प्रारंभी प्राचार्य हितेंद्र आहेर यांनी स्वागत केले. विद्यार्थी संसद सचिव गणेश विश्वनाथ पवार यांनी कुलगुरूंचा विद्यार्थ्यांतर्फे सत्कार केला. डॉ. संभाजी पठारे, डॉ. संजय चाकणे तसेच महाविद्यालयातील उपप्राचार्य, प्राध्यापक सर्व शाखांचे विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. प्रा. एस. आर. भामरे यांनी आभार प्रदर्शन केले.

## संगमनेर महाविद्यालय आणि मॉरिशसचा मराठी माणूस यांचा अनुबंध जुळला :- डॉ. बिदन आबा




पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागातून पीएच.डी. पदवी प्राप्त करणारे मॉरिशसमधले पहिले मराठी भाषिक डॉ. बिदन आबा यांचा नुकताच संगमनेर महाविद्यालयात सत्कार झाला. २०० वर्षापूर्वी मॉरिशसमध्ये गेलेल्या श्रमिक मराठी माणसाने मराठी भाषा व संस्कृती जपण्याचा कसोशीने प्रयत्न केला आहे. महाराष्ट्रातील मराठी समाज आमच्यासाठी सदैव प्रेरणास्त्रोत आहे. संगमनेर महाविद्यालयासारखे महाविद्यालय मराठी भाषा व संस्कृती संवर्धनासाठी सतत प्रयत्नशिल आहे हे पाहून समाधान वाटते असे प्रतिपादन मॉरिशसमधील महात्मा गांधी विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख आणि वाङ्मय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शि. प्र. संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी होते. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. देशमुख, मराठी विभाग प्रमुख प्रा. रामदास बागेश्वर, वाङ्मय मंडळाच्या कार्याध्यक्षा प्रा. मिरा आदमाने आदि मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलतांना डॉ. बिदन आंबा म्हणाले मराठी रंगभूमिपासून घेतलेल्या दशावतारी खेळातून मॉरिशसची मराठी रंगभूमी विकसित झाली आहे. यातूनच मॉरिशसमधील मराठी माणसांची मराठी भाषा व संस्कृती टिकण्यास झालेला हा अनुबंध जोपासण्यासाठी संगमनेर महाविद्यालयातील मराठी विभाग व महात्मा गांधी विद्यापीठ, मॉरिशस यांच्यामध्ये भाषिक, साहित्यिक व सांस्कृतिक आदान प्रदान करण्याच्यादृष्टीने करार करण्याचा विचार मनात दृढ होत आहे. अध्यक्षीय मनोगतात डॉ. संजय मालपाणी म्हणाले की, मराठी माणसाने मॉरिशसमध्ये आपली भाषा व संस्कृती टिकविण्याचा जो पराकाष्ठेचा प्रामाणिक प्रयत्न केला त्याबद्दल आम्हाला नितांत आदर आणि सखोल जाणीव प्रकट करावी वाटते.

प्राचार्य डॉ. के. के. देशमुख या प्रसंगी म्हणाले की, मॉरिशसमधील मराठी माणसाने जातीभेदाचे शुद्र जोखड फेकुन देऊन फक्त मराठी भाषा व संस्कृती हीच आपली ओळख निर्माण केली ही गोष्ट उल्लेखनीय आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. भक्ती डांगे व दीपाली करंजकर यांनी केले.

# College Activities

## Environmental Awareness Campaign -Y. C. Law College




To aware the public on the water pollution caused by the immersion of the Ganesha idol and Nirmalya, Y.C. Law College organised an Awareness Campaign to avoid water pollution, on 3rd September, 2009 i.e. the day of immersion of Ganesha idol, near 'Bhide Bridge', Narayan Peth, Pune.

The students carried the slogans prepared for the awareness. The students convinced the people to immerse the Ganesha idol in the specially constructed tanks by Pune Municipal Corporation and also to drop the Nirmalya in the 'Nirmalya Kalash'. The students convinced more than 30 Ganesha idols to be immersed in the tanks and the use of 'Nirmalya Kalash' to all the devotees.

The said programme was relayed on Etv Marathi along with the interviews of the Students on the same day.

## डॉ. मोहन वामन



पुणे विद्यापीठाच्या महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ विभागात 'ऑफिसर ऑन स्पेशल डयुटी' या पदावर डॉ. मोहन वामन दिनांक १ ऑक्टोबर, २००९ पासून रुजू झाले आहेत. यापूर्वी ते भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय, संगमनेर, जि. अहमदनगर येथे उपप्राचार्य व वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख म्हणून कार्यरत होते. विद्यार्थ्यांच्या 'अविष्कार' व शिक्षकांच्या 'अन्वेषण' या संशोधन उपक्रमांची महत्वपूर्ण जबाबदारी विद्यापीठाने त्यांच्यावर सोपविली आहे.

चेतना अंक पाठविल्याबद्दल प्रथम धन्यवाद!

आपण पाठविलेल्या चेतना अंकाला वाचल्यानंतर असे लक्षात आले की, हा अंक फक्त विद्यार्थ्यांमध्येच चेतना आणण्याचे काम करणार नाही तर जे–जे पुणे विद्यापीठाशी संबंधित आहे. त्यांच्यामध्ये एक नवीन प्रेरणा निर्माण करण्याचे काम करेल. अर्थात करत आहे. पुणे विद्यापीठातील विद्यार्थी कल्याण मंडळातर्फे चालविलेला हा उपक्रम फक्त विद्यापीठ आवारात घडणाऱ्या घटनांचाच लेखाजोखा घेत नाही तर विद्यापीठाबाहेर जे महाविद्यालये महत्वाची कामे करतात (विशेष म्हणजे विद्यार्थ्यांशी संबंधित)·त्याची दखल चेतना घेत आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने अंकाचे नाव आणि कार्य यात सुसंगतता असल्याचे कळते. अंकाच्या माध्यमातून ज्या प्रतिक्रीया, सूचना मागविल्या जातात हे हया अंकाच्या पुढील प्रगतीसाठी महत्वाचे आहे. विद्यार्थी कल्याण मंडळातर्फे राबविलेले विविध उपक्रम विद्यापीठ आणि सामान्य माणूस/ विद्यार्थी यांच्यातील दरी कमी करण्याचे काम करीत आहे आणि 'चेतना' सर्वसामान्य वाचकांपर्यंत जावून 'पुलाचे/सेतुचे' काम करीत आहे. त्यामुळे अशा सकारात्मक कृतीला हार्दिक शुभेच्छा.

**प्रा. भाऊसाहेब पं. सोनवणे, न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर**

# Visitors




Inauguration of the Ontario Maharashtra Goa (OMG) Program in presence of the delegation from Canada

**Chetana** is the Students' Bulletin of Board of Students' Welfare.
We welcome your responses at the following address :

**Board of Students' Welfare**
D .V. Potdar Sankul, University of Pune, Ganeshkhind, Pune - 411 007.
Tel. : 020 2560 1154 / 2560 1153, Fax : 020 2569 7341
E-mail : bsw@unipune.ernet.in, bswunipune@gmail.com

AKRUTI - 020-24224330

**New Website of University of Pune :** http://www.unipune.ac.in

**Important Websites :**

http://www.unipune.erent.in
http://www.Vidyavani.unipune.erent.in
http://www.unipune.erent.in/dept/bsw
http://www.unipune.erent.in/bcud
http://www.unipunenss.in